## जाहिरात

धुळे महानगरपालिका धुळे या कार्यालयामध्ये **"जे.सी.बी. वाहनचालक आणि वाहनचालक"** या पदांवर कंत्राटी पध्दतीने नेमणूक करावयाचे आहे. त्याअनुषंगाने सदर पद ०६ महिन्याच्या कालावधीत करार तत्वावर भरण्याकरिता दिनांक - १३ /०१/२०२५ ते दिनांक - २१/०१/२०२५ या कालावधीत ऑफलाईन स्वरुपात अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | प्रवर्ग | एकूण पदसंख्या | एकत्रित मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | **जे.सी.बी. वाहनचालक** (कंत्राटी) | सर्वसाधारण - ०१<br>अ.जा. - ०१ | ०२ | रु.१७,५००/-<br>(इतर वेतन व भत्ते अनुज्ञेय नाही) |
| २ | **वाहनचालक** (कंत्राटी) | सर्वसाधारण - ०३,<br>अ.जा. – ०१,<br>अ.ज. – ०२,<br>इमाव – ०२,<br>आ.दु.घ. – ०१,<br>वि.जा.अ. – ०१.<br>भज (ब) - ०१ | ११ | रु.१७,५००/-<br>(इतर वेतन व भत्ते अनुज्ञेय नाही) |

### शैक्षणिक अर्हता व अनुभव

१. एस. एस. सी. परीक्षा उत्तीर्ण.
२. जड व हलके वाहन चालविण्याचा परवाना.
३. परवाना मिळाल्यानंतर जे.सी.बी. वाहन / वाहन चालविण्याचा किमान ०३ वर्षांचा अनुभव.
४. मराठी, हिंदी लिहिता, बोलता व वाचता येणे आवश्यक.
५. हलके व जड वाहन देखभाल दुरुस्ती मधील कामासंबंधी प्रशिक्षणाचे मान्यवर शैक्षणिक संस्थेचे प्रमाणपत्र धारण करणाऱ्यास प्राधान्य.
६. शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या-१२ अन्वये सर्वसाधारण उमेदवारासाठी कमाल वय मर्यादा ३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारासाठी कमाल वयमर्यादा – ४३ वर्ष इतकी राहील.
७. वाहनचालक या पदाकरिता ट्रॅक्टर, डंपर, अम्बुलन्स वाहन चालविण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य.

### निवड

१. जे.सी.बी. वाहनचालक व वाहनचालक कंत्राटी यांची निवड महानगरपालिका स्तरीय निवड समितीच्या अखत्यारीत राहील.
२. आयुक्त तथा प्रशासक हे समिती अध्यक्ष तथा नियुक्ती प्राधिकारी असतील.
३. अर्हतेनुसार पात्र असणाऱ्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार मुलाखतीस बोलविण्यात येईल.
४. प्रवर्गातील उमेदवार प्राप्त न झाल्यासउ सदर आरक्षित प्रवर्गातील पदावर सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार भरावयाचे अधिकार आयुक्त तथा प्रशासक यांना राहील.
५. अंतिम निर्णय हा समिती अध्यक्ष यांच्या अखत्यारीत राहील.

### खालीलप्रमाणे अटी व शर्तीवर नियुक्ती करण्यात येईल

१. सदर पदाची नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल, त्यांना शासकीय कर्मचारी म्हणून दर्जा असणार नाही.
२. सदर नेमणुका करार पध्दतीने प्रथमतः ०६ महिन्यांसाठी करण्यात येईल ०६ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत केलेल्या कामकाजाचे गुणवत्तेचा, कामाचा अनुभव व कामाची निकट याबाबत आढावा घेवून वेळोवेळी वाढविता येईल. तथापी, अशी मुदत वाढविताना एकावेळी ही मुदत ०६ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही याची काळजो नियुक्ती प्राधिकारी घेईल अशा मुदतबाढ कमाल ३ वेळा असेल. त्यानंतर उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास, त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस नव्याने सामोरे जावे लागेल.
३. संबधित नियुक्ती प्राधिकारी महानगरपालिकेच्या वतीने नियुक्तीच्या वेळी संबधितां बरोबर विहीत प्रपत्रात करार करतील कराराचे विहीत प्रपत्र "परिशिष्ट अ" मध्ये देण्यात आले आहे कराराची सर्व कागदपत्रे जतन करुन ठेवणे ही संबंधीत कार्यालयाची जबाबदारी असेल.

४. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिकारी / कर्मचा-यांना एकत्रित मानधन व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाही.
५. शासन व महानगरपालिका वेळोवेळी सुधारीत करेल अश्या अटी व शर्ती लागू राहतील
६. प्राप्त होणाऱ्या अर्जाची छाननी करुन धुळे महानगरपालिका, धुळे येथील नोटीस बोर्डावर व वेबसाईटवर पात्र/अपात्र उमेदवाराची यादी वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.
७. सदर कंत्राटी नियुक्ती नंतर कायम सेवेत सामावून घेणेबाबत मे.न्यायालयात अथवा इतर सक्षम प्राधिकारणाकडे दाद मागता येणार नाही.
८. नियुक्ती प्राधिकारी यांना आपल्या नियुक्तीबाबत व कामकाजाबाबत शंका / तक्रार / हरकत प्राप्त झाल्यास आपली नियुक्ती संपूष्टात आणण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील.

**आवश्यक कागदपत्र**

१. विहीत नमुन्यातील अर्ज.
२. आधार कार्ड. (स्वयं साक्षांकित)
३. अर्हतेचा पुरावा. (स्वयं साक्षांकित)
४. महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र.
५. अनुभव प्रमाणपत्र.
६. जन्म तारखेचा पुरावा.
७. पासपोर्ट साईज फोटो (रंगीत, २ प्रती)
८. आ.दु.घ. प्रवर्गात अर्ज सादर करणाऱ्यांना सक्षम प्राधिकारणाचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**अर्ज सादर करण्याची प्रक्रीया**

१. उमेदवाराने https://dhulecorporation.org या वेबासाईटवरुन अर्जाचा नमूद डाऊनलोड करुन. हार्डकॉपी मध्ये अर्ज भरुन आवश्यक त्या संपूर्ण कागदपत्रासह धुळे महानगरपालिका, धुळे (आस्थापना शाखा) येथे समक्ष येऊन अर्ज जमा करावे. (अन्य मार्गाने पाठविलेले अर्ज ग्राहय धरले जाणार नाही).

**खालील प्रकाराचे अर्ज सदोष गणले जातील व त्यांचा विचार करण्यात येणार नाही. -**

१. विहीत पात्रता धारण न करणारे.
२. मजकूर चुकीचा किंवा अपूर्ण भरलेले अर्ज
३. स्वाक्षरी नसलेले अर्ज
४. ओळखपत्र म्हणून आधार कार्डची स्वसाक्षांकीत छायांकीत प्रत नसलेला अर्ज
५. अर्ज स्विकृतीचा शेवटचा दिनांक 29/9 /२०२५ रोजी सायंकाळी ५-४५ असल्याने त्यानंतर कार्यालयात प्राप्त झालेले अर्ज (अन्य आपत्कालीन परिस्थितीमुळे)
६. एकदा नाकारण्यात आलेल्या अर्जाबाबत पुर्नविचार केला जाणार नाही. त्यासंबंधी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल धुळे महानगरपालिका कार्यालयाकडून घेतली जाणार नाही.
७. उमेदवाराचे छायाचित्र (फोटो) साक्षांकित केलेले नसल्यास.
८. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांच्या / प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती नसलेले अर्ज.

विहीत किमान अर्हता धारण करणा-या पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात व वरील आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज मागविण्यात येत असून, अर्जदार हा पात्र असल्यास त्यांनी दिनांक 29/9 /२०२५ सायंकाळी ५-४५ पावेतो प्रक्रीया पूर्ण करावी.

अर्जाचा नमूना https://dhulecorporation.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदर नमुना Download करून त्या नमुन्यात अर्ज करण्यात यावा.

सदर पदासाठी पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल. त्याबाबत पात्र उमेदवारांना मुलाखतीचा दिनांक व वेळ स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

**ठिकाण** – धुळे
**दिनांक** – 08/09/२०२५

(अमिता दगडे-पाटील)
आयुक्त तथा प्रशासक
धुळे महानगरपालिका धुळे